# मा. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली होणारी शारदीय नवरात्र महोत्सव वर्ष 2017 ची आढावा बैठक दिनांक 15 सप्टेंबर, 2017

महाराष्ट्र शासन.
अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद यांचे कार्यालय.
E-mail :- statesxcise@yahoo.com
दूरध्वनी (02472) 223387

# -: सु स्वा ग त म :-

# शारदीय नवरात्र महोत्सव वर्ष 2017 निमित्त तुळजापूर शहरामध्ये कायदा व सुव्यवस्थे बाबत करावयाची कार्यवाही

नवरात्र महोत्वाच्या कालावधीमध्ये अवैधरित्या मद्य निर्मिती/वाहतूक/विक्री होते किंवा कसे या बाबत निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, तुळजापूर व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सिमा तपासणी नाका, भरारी पथक, उमरगा/तुळजापूर यांचे अधिपत्याखाली विशेष पथकाची निर्मिती केली आहे. त्यामध्ये त्यांचे अधिपत्याखालील स्टाफ सहभागी राहील. त्यांचेकडून तुळजापूर परिसर व तामलवाडी रोड, नळदूर्ग रोड, उस्मानाबाद, रोड, लातूर रोड या भागामध्ये गस्त घालून अवैध रित्या होणाऱ्या मद्य निर्माते/वाहतूकदार व विक्रेत्या विरुध्द मुंबई दारुबंदी कायदा 1949 व सुधारीत अधिनियम 2005 अन्वये आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल.

तसेच नवरात्र महोत्सवाच्या कालावधीमध्ये मा. जिल्हाधिकारी महोदय ज्या दिवशी कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यासाठी मद्य विक्री साठी कोरडा दिवस जाहिर करतील त्या दिवशी सर्व प्रकारच्या अबकारी अनुज्ञप्त्या बंद ठेवण्यांत येतील. व सदर दिवशी सुध्दा अवैध मद्य विक्री होणार नाही या बाबत कटाक्षाने या विभागाकडून कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यांत यईल.

अधीक्षक,

राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद